# भूगोल या शालेय विषयातून भाषाविकास

(सुचिता पडळकर यांना सर रतन टाटा ट्रस्टच्या आर्थिक सहाय्याने उभ्या राहिलेल्या प्रगत शिक्षण संस्थेच्या सेंटर फॉर लॅग्वेज, लिटरसी ॲण्ड कम्युनिकेशन यांच्यातर्फे २००९-१० मध्ये जुनियर फेलोशिप मिळाली होती.)

सृजन आनंद विद्यालय, कोल्हापूर या प्रायोगिक प्राथमिक शाळेतील मी शिक्षक आहे. गेली वीस वर्षे इयत्ता पहिली ते चौथी विविध विषय शिकवत आहे, विद्यालयात येणारी मुले कष्टकरी–मध्यमवर्गातली. वयाची पाच वर्षे पूर्ण करून मुले जेव्हा पहिलीत दाखल होतात तेव्हा त्यांना त्यांच्या गरजा पूर्ण करण्याइतकी परिसरभाषा म्हणजेच मराठी येत असते. आपले म्हणणे सांगणे, मागणी करणे, विनंती करणे, हट्ट करणे, अडवणूक करणे, दोस्ती करणे, भांडणे इत्यादी प्रकारची वाक्यरचना ती करतात. म्हणजेच संवदासाठी आवश्यक तेवढी भाषा त्यांना येत असते. सर्वसाधारणपणे घरातून होणारे भाषाशिक्षण हे इतके आणि पुढेही इतकेच असते. इयत्ता पहिलीत लिपी परिचय होतो. आता मुलांना लिहिती-वाचता येऊ लागते. लिपीज्ञानामुळे गणित, परिसर अभ्यास, विज्ञान, इतिहास, भूगोल इ. शालेय विषयांचा अभ्यास त्यांना सुकर होतो. कारण सर्वच विषय आपण भाषेकरवी शिकत असतो. म्हणून मराठी ही शालेय अभ्यासक्रमातील केवळ एक विषय नसून अभ्यासक्रमतील सर्व विषयांचा पाया आहे. भाषा नीट उमगत असली की मुलांना कोणताही विषय शिकणे सोपे होते.

माझ्या असे लक्षात आले आहे की, शिक्षक बोलतात ती मराठी मुलांना पूर्णपणे कळत नसते. उदाहरणार्थ
'हे कोवळे पान कसे तांबूस आहे आणि मऊसूतही आहे.'
'अरे, समोर क्षितिजाकडे पहा तो दिसतोय् ना तो आपला पन्हाळा.'
'आज बोचरी थंडी पडली आहे बुवा !'
'….. हे वृक्षतोडीचे परिणाम आहेत.'

या आणि अशा वाक्यांनंतर मुलांचा प्रश्न असतो, "ताई, म्हणजे काय?" त्यांना कोवळे, तांबूस, मऊसूत, क्षितीज, बोचरी, वृक्षतोड, परिणाम यांचे अर्थ सांगावे लागतात मग वाक्याचा अर्थबोध होतो. जसे बोलण्याचे तसेच वाचण्याचे. क्रमिक पुस्तकातील बरेच शब्द मुलांसाठी नवीन असतात. हे नवीन शब्द त्या त्या विषयातील पारिभाषिक शब्द असतात असेही नाही ते मराठीतील अर्थपूर्ण, नेमके शब्द असतात. अशावेळी मुले केवळ विषय शिकत नसतात तर भाषाही शिकत असतात.

या माझ्या अनुभवाच्या आधारे यावर्षी इयत्ता तिसरी आणि चौथीला भूगोल विषय शिकवताना मी ठरवले की 'भूगोलातून भाषाविकास' कसा होतो, कसा करता येतो याचा शोध घ्यायचा. माझ्या या अभ्यासासाठी फलटणच्या प्रगत शिक्षण संस्थेने सर रतन टाटा ट्रस्ट पुरस्कृत सेंटर फॉर लॅग्वेज, लिटरसी ॲण्ड कम्युनिकेशनच्या माध्यमातून प्रोत्साहनपर विद्यावेतन दिले. तसेच या कामासाठी वेळोवेळी चर्चाही केली. यामुळे शिस्तपूर्ण, नियोजनबध्द आणि योजलेले काम माझ्या हातून पूर्ण होऊ शकले.

मी केलेला अभ्यास संक्षेपाने येथे मांडते आहे.
प्राथमिक स्तरावर भाषाशिक्षण आणि भूगोल शिक्षणाची काही उद्दिष्टे अभ्यासक्रमाचा मसुदा (शिक्षणशास्त्र संस्था, महाराष्ट्रराज्य) आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ यात नमूद केलेली आहेत. त्यापैकी काही उद्दिष्ट्ये मी येथे उद्धृत करते.

१. मातृभाषेतील शब्दसंग्रह, वाक्यरचना यांचा परिचय विद्यार्थ्यांना व्हावा व त्याचा वापर त्यांना दैनंदिन जीवनात करता यावा.
२. भाषा हे ज्ञान ग्रहणाचे साधन आहे. मिळालेले ज्ञान व्यक्त करण्यास भाषेची गरज आहे यासाठी प्रमाण भाषेवर प्रभुत्व हवे.
३. भाषेची जडण-घडण समजून घेऊन कमीतकमी शब्दात व वाक्यात आपले विचार, भावना कौशल्यपूर्ण रितीने व्यक्त करणे.

४. भाषेच्या अभ्यासातून मानवाचा व्यक्तिविकास होतो. भाषा हे विचारांचे साधन आहे.... म्हणून भाषाभ्यास आवश्यक आहे.

भूगोल विषयाची दोन वैशिष्ट्ये–

१. निरनिराळ्या भौगोलिक घडामोडी समजून घेणे व भौगोलिक घडामोडींकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता निर्माण करणे.
२. परिसरातील घटकांचे परस्परावलंबित्व लक्षात येणे.

कोणत्याही विषयाचा प्रमुख उद्देश त्या विषयाच्या संकल्पना समजणे असा असतो तसाच त्या आधारे विचारप्रवृत्त होणे हाही तेवढाच किंबहुना थोडा जास्तच महत्त्वाचा उद्देश असतो. हा उद्देश भाषेच्या माध्यमातून व्यक्त होत असतो. हे सूत्र लक्षात घेऊन मी भूगोलाच्या विषय ज्ञानाबरोबर भूगोलातून भाषाविकास कसा होतो हे पाहण्यासाठी उपक्रम योजणे, नोंदी ठेवणे व त्याचे मूल्यमापन करणे असे नियोजन केले. इयत्ता तिसरी व चौथीचे पाठ्यपुस्तक मंडळाचे भूगोलाचे क्रमिक पुस्तक हा प्रमुख स्त्रोत मानला. भाषेतील शब्द, रचना व विचार या बाबींकडे मी लक्ष दिले.

भूगोलाच्या क्रमिक पुस्तकात संकल्पना शब्द (पारिभाषिक शब्द) व उष्मा, मृदा या सारखे अन्य विषयानुरूप मराठी शब्द असे दोन प्रकारचे नवीन शब्द येतात. या शब्दांच्या स्पष्टतेसाठी मी वर्गात चित्र, फोटो, सी. डी., अनुभव कथन, प्रत्यक्ष अनुभव घेणे यांचा उपयोग केला. इयत्ता तिसरीत ५ संकल्पना समजतात तर इयत्ता चौथीच्या पुस्तकातून ३० संकल्पना मुले शिकली. एवढे नवे शब्द त्यांना सांगितले गेले. परंतु ते त्यांना कळले का याचा पडताळा घेण्यासाठी वर्षाअखेरीस यातील संकल्पना शब्द मुलांना आपल्या शब्दात विस्ताराने लिहायला लावल्या. यातून आमचा संकल्पना कोश तयार झाला. यातील मुलांचे लेखन वाचताना विषयाच्या आकलनचे-विचार करण्याचे विविध पैलू आपल्याला दिसतात. उदा. अमावास्या या संकल्पनेबद्दल चौथीतील जान्हवीने असे लिहिले आहे – पौर्णिमेनंतर अमावास्या पंधरा दिवसांनी येते. पौर्णिमेनंतर चंद्राची कला बदलत जाते. तिची कला कमी कमी होत जाते. चंद्र दिसेनासा होतो त्याला अमावास्येची रात्र म्हणतात. सूर्यग्रहण कधीही अमावास्येलाच होते. अमावास्येला काहीजण वेगवेगळ्या गाड्यांची पूजा करतात, काहीजण वेगवेगळ्या अंधश्रध्दा पाळतात. त्या सर्व खोट्या असतात.

क्रमिक पुस्तकात विषयानुरूप येणाऱ्या नवीन शब्दांची भलीमोठी यादी आमच्याकडे तयार झाली आहे. उदाहरणादाखल इयत्ता तिसरीच्या पुस्तकातील काही शब्द पहा – लुकलुकणे, प्रखर, प्रमाणबध्द, उठावदर्शक, आल्हाददायक, निरभ्र, वन्य, नदीपात्र, मेष, प्रजाती, नामशेष, एकसंधता, चिंचोळा भाग, पर्जन्य, सुपीक अग्रेसर... शब्दांचा अधिक बारकाईने अभ्यास करताना एक बाब मुलांच्या लक्षात आणून दिली काही शब्द सुटे करून पाहिले की त्यांचा अर्थ आपोआप उलगडतो. उदा. खगोल = ख + गोल, भूरुपे = भू + रुपे, जलौघ = जल + ओघ हे एक चांगले अवजार मुलांना मिळाले. शब्द सुटा करून पाहण्याचा त्यांना नाद लागला. असे आणखीही काही उपक्रम वर्गात होत होते. चौथीच्या मुलांनी शब्दकोशात शब्दांचे अर्थ पाहण्याचे कौशल्य मिळवले आहे. भूगोलातील पायाभूत, तंत्रज्ञान, ऊर्जा, दुर्गम, पाणलोट अशा अनेक शब्दांचे अर्थ शब्दकोशात पाहण्याचा, आपल्याला माहीत असलेला अर्थ पडताळण्याचा छंद मुलांना लागला.

आपल्याला सांगायचे आहे ते नीट वाक्यरचना करून सांगाण्याचे-लिहिण्याचे कौशल्य या वयातील बहुतेक सर्व मुलांजवळ असते. चौथीमध्ये मी यापुढील टप्पा घेतला. मी योजलेल्या उपक्रमात विषय समज महत्त्वाची होती त्याचबरोबर जर-तर, आणि, परंतु, किंवा, म्हणून, कारण, मात्र, पण यांचा वापर करून संयुक्त वाक्यरचना करण्याचे कसब मुले शिकत होती.

मुलांची काही वाक्ये वाचूया.

१. जर पृथ्वी स्वतःभोवती फिरायची थांबली तर दिवसरात्र होणार नाहीत.
२. सह्याद्रीच्या पश्चिमेला भरपूर पाऊस पडतो पण पूर्वेला पर्जन्य छायेचा प्रदेश आहे.
३. साखर कारखाने मोठा उद्योग आहे आणि सूतगिरण्याही मोठा उद्योग आहे.
४. महाराष्ट्र बेसाल्ट खडकाचा आहे त्यामुळे इथे जास्त पाणी मुरत नाही.
५. तापी नदीच्या खोऱ्याने उत्तर महाराष्ट्राचा बराचसा भाग व्यापला आहे परंतु तिचा उगम मध्यप्रदेशात आहे.
६. सह्याद्रीला सह्याद्रीपर्वत किंवा पश्चिमघाट असेही म्हणतात.

अशी भरपूर वाक्ये मुलांनी सांगितली की ज्यातून विषय ज्ञान आणि वाक्यरचना या दोन्हीची जाण लक्षात येते. ही वाक्ये झाल्यावर मुलांनी शोधलेले काही निष्कर्ष लक्षवेधी आहेत.
१. काही वेळा वाक्याच्या सुरुवातीला ‘जर’ येत नाही पण पुढे फक्त ‘तर’ येतो. तेव्हा ‘जर’ मनात धरलेला असतो. उदा. पाऊस पडला नाही तर पिके कशी येणार?
२. ‘मात्र’, ‘परंतु’ हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरता येतात.
आपण विहिरीचे पाणी पितो मात्र/परंतु समुद्राचे पीत नाही.
३. ‘त्यामुळे’ आणि ‘म्हणून’ हे दोन शब्द सुध्दा एकाच अर्थी वापरता येतात.
कोकणात समुद्र आहे त्यामुळे तेथे दमट हवा आहे.
कोकणात समुद्र आहे म्हणून तेथे दमट हवा आहे.
४. वाक्याचा दुसरा भाग आधी घेतला तर कारण ऐवजी म्हणूनने वाक्य होते.
उदा. मुंबईत जास्त लोकसंख्या आहे कारण तिथे उद्योगधंदे आहेत.
मुंबईत उद्योगधंदे भरपूर आहेत म्हणून तिथे लोकसंख्या जास्त आहे.

भाषा शिक्षणाची आणि भूगोल शिक्षणाची उत्तम सांगड घालत आमचा अभ्यास सुरू होता. भाषा हे विचारांचे साधन आहे. भूगोलातील विचार मुले मांडत आहेत हे मला स्पष्ट दिसत होते. आता मी आमच्या तिसऱ्या टप्प्यावर येते. या विभागात वर्तमानपत्रातील भौगोलिक बातम्यांचा वापर विचार मांडण्यासाठी केला होता. त्यासाठीच्या उपक्रमाची केवळ यादी पाहू.
१. बातमीवर मत नोंदवणे.
२. चित्र पाहून बोध करून घेणे त्यासाठी योग्य शीर्षक देणे.
३. आपल्या शब्दात बातमी लिहिणे.
४. वाचलेल्या बतमीचा संक्षेप करणे.
५. चित्रवर्णन करणे.
६. वर्तमानपत्रातील माहितीला प्रश्न विचारणे.
७. बातमीतील तृटी संपादकांना कळविणे.

भूगोलाचा असा अभ्यास करायला मुलांना फार आवडत होते. वार्षिक मूल्यमापनावेळी शिकलेल्या अभ्यासावर घोषणा (स्लोगन्स) करण्याचा पाठ झाला.

मुलांनी केलेल्या घोषणा वाचूया.
१. सूर्याची किरणे आहेत प्रखर
पण ओझोन वायू करतो आमची कदर.

२. आम्ही भूगोलात शिकतो काय?
नद्या, धरणे, तलाव हाय!

३. आमचा भूगोल तिची आहे भाषा.
करतो आम्ही वाचन नकाशा.

४. नकाशे आहेत पुस्तकात.
अर्थ शोधूया परिसरात.

मी तर मुलांच्या कमावर खूष होते. या अभ्यासामुळे दुहेरी लाभ झाला. मुलांना भूगोल विषय चांगला समजला हे मला कळले. भाषा विकासासाठी अनेक उपक्रम योजले गेले. वर्गातील सगळी मुले यात सहभागी होत होती. आपली आपली वाक्ये करत होती. एकमेकांना मदतही करत  होती. काहींजवळ हे कौशल्य विलक्षण होते तर काही खालच्या पायरीवर होते. कोणताही विषय शिकण्यासाठी भाषा आधारभूत असते. तसेच तो विषय शिकताना मुलांची भाषा विकसित होते हे मी वर्षभर पहात होते.

**सुचिता पडळकर**
५९, प्रतिभानगर,
कोल्हापूर ८